**Global Online Electronic International Interdisciplinary**

**Research Journal (GOEIIRJ)**

**Peer - Reviewed Journal, {Bi-Monthly }**

**ISSN : 2278 – 5639**

**Impact Factor : 1.883** (Year : Aug. 2015 - 16 by impactfactorservice.com)

# Certificate of Publication

**This is to certify that**

**Mr./Ms./Dr./Prof.** सज्जन च्युल.

**Submitted the paper entitled,**

पर्यावरण शिक्षणाद्वारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे

जतन व संवर्धन.

**has been published in Volume** IV **, Issue** III **,** october **2015**

**in Global Online Electronic International Interdisciplinary**

**Research Journal.**

**Mr. Rakesh Ramraje**
**Chef Editor & Author**

**Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal.**

**( www.goeiiej.com )**

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षणाद्वारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन

डॉ. सज्जन थूल,
सहायक प्राध्यापक,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422222.

संपूर्ण जगापूढे सर्वात महत्त्वाचा प्रश्न भेडसावतो तो म्हणजे पर्यावरणाची अधोगती होय. मानव, प्राणी व इतर सजिवांचे संवर्धन करणे व त्यांची शाश्वतता वाढविणे हे अतिशय गरजपूर्ण कार्य मानवाला करावे लागणार आहे. त्यामुळे मानवजातीला निसर्गाच्या भवितव्याविषयी अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलावे लागणार आहे. ही जागतिक समस्या सोडविण्यासाठी प्रत्येकाला आपल्या जीवनातील काही वेळ द्यावा लागेल, असे वाटते. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी मानवाला प्रत्येक क्षणी विचार करून इतर व्यक्तींच्या मनात पर्यावरण जागृतीचे महत्त्व बिबंवावे लागणार आहे.

पर्यावरण हे भौतिक व जैविक घटकांनी बनलेले आहे. पृथ्वीवरील जैविक घटकाने दुसऱ्या घटकाच्या पोषनाकरिता वस्तुचे जतन व संवर्धन करणे आवश्यक झाले आहे. मानव व इतर जीव सभोवतालच्या वातावरणाशी समायोजन करून जीवन जगतात. परंतु मानव जातीच्या अति वापरामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होताना आपणास दिसते आहे. जीवन जगण्यासाठी प्राणी व मानवात शर्यत आहे असे नाही तर प्रत्येक सजीवास जगण्यासाठी धडपड करीत आहे. उपजिविकेचे साधनच एकमेकात पाहतात, हे नैसर्गिक नियम आहे किंवा यालाच अन्न साखळी असे संबोधले जाते. यामुळे पर्यावरणात समतोल राखला जातो. परंतु मानव जातीच्या अतिवापरामुळे काही प्रजाती नामशेष होत आहेत. यासाठी पर्यावरण शिक्षणातुन नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन केल्याने येणाऱ्या पिढीला उपयोगी पडेल असा विचार समाजातील प्रत्येक मानवाकडे असावा,कारण त्याशिवाय निसर्गाची अवनती थोपविता येणार नाही. पर्यावरण शिक्षणासह लोकसंख्या शिक्षणातुनही निसर्गाचे संवर्धन ही संकल्पना राबविता येईल.

पर्यावरणातील संपदाचे जतन करण्यासाठी सेंद्रीय खताचा वापर, सौर उर्जेचा वापर, टाकाऊ वस्तुचा पुन्हा वापर, पडीक जमिनीचा वापर, जैवविविधतेचे जतन, जल संवर्धन, वनसंरक्षण आणि विज्ञान तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केल्यास सर्वच प्रजातिचा सुयोग्य विकास होईल. मानवाने पुरेपूर वापर करण्याअगोदर पर्यावरणाबाबतचे विविध प्रश्न म्हणून दुष्काळ, उपासमार, प्रदुषण, पर्जन्यमानातील घट, कुपोषण, मानव व नैसर्गिक आपत्ती, भूकंप इत्यादी प्रश्नावर सुयोग्य विचार करावा लागेल. पर्यावरणातील प्रत्येक घटकाच्या चौकटीत राहूनच जीवन उंचावता येईल. वृक्ष लागवड, जल साक्षरता, अतिविघटनशिल वस्तुचा कमी वापर, ईलेक्ट्रॉनिक वस्तुची निर्मितीत चिरकाल टिकणाऱ्या सुट्या भागांची निर्मिती करणे, रासायनिक खतांचा मर्यादित वापर करणे याविषयीची माहिती सर्वांना करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

भारतीय राज्य घटनेच्या ४२ व्या घटना दुरूस्तीच्यावेळी पर्यावरण संरक्षणाचा समावेश केला आहे. वन्यजीव संरक्षण कायदा-१९७२, जलप्रदुषण प्रतिबंधक व जलप्रदुषण नियंत्रक कायदा-१९७४, वनसंवर्धन कायदा-१९८० आणि हवा प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा-१९८१ या कायद्याच्या आधारे पर्यावरणाची महती सर्वापर्यंत पोहचली पाहिजे त्याशिवाय मानवाला इतर प्राणीमात्राशी जुळवून घेता येणार नाही.

नैसर्गिक साधनसंपत्तीची गरज पटविण्यासाठी पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे ठरविणे गरजेचे आहे. त्याच्या आधारेच व्यक्तीचा विकास होणार आहे. ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-

०१ पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून देणे.

०२ वन्यजीव, जल आणि वातारणाचे महत्त्व पटवून देणे.

०३ निर्माता आणि उपभोक्ता यांच्यातील आंतरक्रियां समजावून देणे.

०४ स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण प्रदुषणाची जागृती करणे.

०५ प्रदुषणाच्या कारणांच्या आधारे उपाययोजना राबविण्यासाठी समर्थ बनविणे.

०६ पर्यावरणातील प्रत्येक घटकाची हानी न होता त्या शाश्वत कशा ठेवता येतील याविषयीची जागृति निर्माण करणे आवश्यक आहे.

०७ पर्यावरणातील प्रजातिचे जतन व संवर्धन करण्याची वृत्ती विकसित करणे.

०८ पर्यावरण जागृतिसाठी विविध शिबीरे, समेल्लने आणि चळवळ राबविणे.

०९ ईलेक्ट्रॉनिक्स वस्तुची निर्मिती बरोबरच तिच्या सुयोग्य वापराची व विल्लेवाट लावण्याची जागृति निर्माण करणे.

१० नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी गावपातळीवर ग्रामपंचायतीमार्फत लोकांना उद्बोधित करणे.

११ वन्यजीव, जलप्रदुषण व हवा प्रदुषण संबंधित कायद्याचे ज्ञान पटवून देणे.

या सर्व उद्दिष्टांच्या आधारे व्यक्तीला माहिती उपलब्ध करून दिल्यास बऱ्याच अंशी नैसर्गिक साधनसंपत्तीची जतन करण्यासाठी हातभार लागेल. पर्यावरण शिक्षणातुन व्यक्तीच्या जीवनाला नवी दिशा मिळते. त्यामुळेचे निसर्गाचे अवह्यातपणे कार्य चालेल. मानवाच्या सुखी जीवनासाठी पर्यावरण शिक्षणाद्वारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे सुयोग्य वापर करणे शक्य होईल. मानवाला सुयोग्य नियोजन करण्याची गरज आहे यासह त्यांच्या विकासात निसर्गाचा मोठा वाटा आहे.